
# मराठीसृष्टी पुस्तक सूची (Demo)

## पुस्तकांच्या पलीकडे





पुस्तके ज्ञान देतात हे मान्य करतानाच, पुस्तकांच्या बाहेरचे जग अधिक अनुभव देणारे, अधिकचे ज्ञान देणारे आहे, हाच, जरा व्यापक अर्थाने या पुस्तकाचा धडा आहे. शाळेत होणाऱ्या शिक्षणापेक्षा, शाळेबाहेर मिळणाऱ्या अनुभवांतून होणारे शिक्षण, हे खरे पुस्तकाबाहेरचे शिक्षण आहे; ह्या विचाराकडे नेण्यात हे पुस्तक यशस्वी झाले आहे आणि ते आजच्या, नवशिक्षण विचाराशी सुसंगत आहे.

लेखक : डॉ. अनिल कुलकर्णी

प्रकाशक : मराठीसृष्टी

किंमत : रु.१००/-

# पाकिस्ताननामा




दैनिक लोकसत्ता, दैनिक केसरी या वृत्तपत्रांचे माजी संपादक श्री. अरविंद व्यं. गोखले यांनी तीन वेळा पाकिस्तानला भेट देऊन लिहिलेल्या थरारक आठवणींचा हा संग्रह.

पाकिस्तानच्या सर्व प्रमुख शहरांना भेट देऊन तेथील राजकीय / सामाजिक परिस्थितीचे मार्मिक चित्रण श्री. गोखले यांनी केलेले आहे.

तत्कालीन पंतप्रधान श्रीमती बेनझीर भुट्टो यांची परखड मुलाखत हेही या संग्रहाचे एक प्रमुख वैशिष्ट्य.


पाकिस्तानविषयी कुतुहल असणाऱ्या वाचकांना आणि अभ्यासकांनाही हा संग्रह उपयुक्त वाटेल.

**लेखक** : अरविंद व्यं. गोखले

**प्रकाशक** : मराठीसृष्टी

**किंमत** : रु.१०० /-

# गमती देशोदेशीच्या





या पुस्तकात आपल्याला खूप वेगवेगळे अनुभव वाचता येतील. कधी नवीन माहिती कळेल तर कधी पुनःप्रत्ययाचा आनंद मिळेल. काही स्थळे तर खूपच वेगळी, त्याच्यासारखे दुसरे काही न बघितल्यासारखी वाटतील. ’जगातील सर्वात उंचावरून म्हणजे 16000 फूटांवरून धावणाऱ्या आगगाडीचा प्रवास’. तिबेट हा देश तसा भेट देण्यासाठी अवघड असल्याने खूपच वेगळे काहीतरी वाचल्याचा अनुभव येईल. नाझकाच्या अगम्य रेषा शाळेत शिकलेल्या भूगोलाची आठवण करून देतील. तर ’इजिप्तमधले पिरॅमिडस व नाईलच प्रवास’, ’उरोसची तरंगती बेटे’, ’जपानचा साकुरा’, ’स्वित्झर्लंडचे झरमॅट’, ’दक्षिण आफ्रिकेतील ’माबुला लॉज’ची वर्णने तिथे जाण्याची इच्छा मनात निर्माण करतील. दुबईसारख्या वाळवंटी प्रदेशातील बागा बघायला जाण्याचा नक्कीच मोह पाडतील व तिथे गेल्यावर ’कशासाठी पोटासाठी’ मध्ये वर्णन केलेल्या कॉर्निशला भेट देण्याची आठवण नक्कीच येईल. ’तांबोपाटा’ मधील व ’वाईटामो केव्हज’ मधील वर्णन आपल्याला पुनःप्रत्ययाचा आनंद देईल. चिनी लोकांची मुखवटा बदलण्याची कला खूपच वेगळी वाटण्याजोगी आहे. हा प्रवास कसा सुरू झाला, त्यातली ’अडथळ्यांची शर्यत’ कशी संपली याचे वर्णन वाचून प्रत्येकाला आपल्या पहिल्या प्रवासाची आठवण आल्याखेरीज राहाणार नाही. सिंगापूरला गेल्यावर पहिले काही दिवस कसे गेले, तिथे रुळायला काय काय करावे लागले हेही ’सिंगापूरच्या आठवणी’ वाचल्यावर काहीजणांना त्यांच्या बदल्यांमुळे आलेले अनुभव आठवायला लावतील.

**लेखक** : अनामिका धनंजय बोरकर

**प्रकाशक** : माराठीसृष्टी

**किंमत** : रु.१००/-

# घर हरवलेला पोलीस




मुंबई पोलिसांचे सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त श्री. व्यंकट पाटील यांचा 'घर हरवलेला पोलीस' हा त्यांच्या पोलीस खात्यातील रोजच्या अनुभवावर आधारीत असलेला कथासंग्रह आहे. त्यातील 'श्रीयुत विसरभोळे', 'कथा एका चावीची', 'प्रेत उठून धाऊ लागले' आदी कथा फारच गंमतीशीर व वाचनीय झाल्या आहेत.


व्यंकट पाटील यांचा 'घर हरवलेला पोलीस' हा कथासंग्रह पोलिसांना पोलीस ठाण्यात येणाऱ्या अनुभवांवर जरी असला तरी पोलिसांना रोज काय काय कामे करावी लागतात, लष्कराच्या कशा भाकऱ्या भाजाव्या लागतात, रात्री - अपरात्री 'डेड-बॉडी' जवळ कसे थांबावे लागते, त्यातून काय काय भोगावे लागते याचे मार्मिक विवेचन पाटील यांनी केले आहे.

**लेखक** : व्यंकट पाटील

**प्रकाशक** : मराठीसृष्टी

**किंमत** : रु. १००/-

# झांझिबार डायरी




जागतिक बँकेचे परिवहन विषयातील सल्लागार असलेले अरुण मोकाशी झांझीबारमध्ये विश्व बँकेमार्फत “परिवहन विशेषज्ञ” म्हणून दोन वर्षासाठी गेले असतांना त्यांनी लिहिलेली ही झांझीबार डायरी. त्यात त्यांनी वर्णिला आहे – आफ्रिकन लग्न सोहोळा आणि लगीनघाई, आफ्रिकन लोकांचे बिअर सेवन, सेरेगेटीतील प्राण्यांचे टान्झानिया-केनिया-टान्झानियाचे अदभूत स्थलांतर, बेटावर रहाणारा पण हवेत उडणारा कोल्हा, व्हिक्टोरिया नदीच्या पात्रातल्या आता निर्वंश होत चाललेल्या मासोळ्या, एक बलाढ्य कासव, जंगलातले जिराफ, आफ्रिकेत रहाणाऱ्या भारतीयांचे गृहजीवन, समुद्रात बुडालेली एक अविस्मरणीय नौकाडुबी – अशा पंचवीस चित्तथरारक कथा !

वाचताना सतत वाटते की – अरे, आपण कितीतरी बाबतीत अगदी सारखे! झांझीबार देशातले हे सोहोळे वाचतांना मग जाणीव होते, हा तर

**त्यांचा आणि आपला .....**

**अवघा रंग एकचि झाला !!!**


**लेखक** : अरुण मोकाशी

**प्रकाशक** : मराठीसृष्टी

**किंमत** : रु. २००/-

**सवलत किंमत** : रु. ५०/-

# गावाकडची अमेरिका




सर्वसाधारणपणे अमेरिकेत, किंवा एकूणच परदेशात जाऊन आलेली मंडळी तिकडच्या शहरांविषयीच बोलतात, लिहितात. प्रवासवर्णनेही शहरकेंद्रित असतात. कदाचित पर्यटक म्हणून गेल्यावर शहरातच फिरणे जास्त होत असेल किंवा गावांमध्ये काय बघायचे अशी भावना असेल. या पुस्तकाचं वेगळेपण इथेच आहे.

अमेरिकेत दहा वर्षाहून जास्त काळ ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या डॉ.संजीव चौबळ यांनी तिथल्या ग्रामीण जीवनाचं सुंदरसं चित्र आपल्यासमोर उभं केलेलं आहे. आजकाल मुंबई-महाराष्ट्रात वास्तव्याला असणाऱ्या बहुतांशी मराठी माणसांचाही मराठीत लिहिण्याचा (आणि बोलण्याचाही) सराव हद्दपार झालेला आहे. या पार्श्वभूमीवर डॉ.संजीव चौबळ यांचं आणखी एक वैशिष्ट्य जाणवलं ते म्हणजे इतका मोठा काळ अमेरिकेत घालवूनही त्यांची आपल्या मातृभाषेची नाळ तुटलेली नाही. पुस्तकाचं हस्तलिखित पाहिल्यावर प्रथमदर्शनीच त्याची साक्ष पटली. अत्यंत स्पष्ट आणि सुवाच्य अक्षर, खाडाखोड तर अजिबात नाही. भाषाही सुंदर आणि हवी तिथे अलंकारिकही.

**लेखक** : डॉ. संजीव चौबळ

**प्रकाशक** : मराठीसृष्टी

**किंमत** : रु. १५०/-

**सवलत किंमत** : रु. ५०/-